# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक ०४/०३/२०२५ (मंगळवार)

---

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक ०३/०३/२०२५ रोजी नरखेड पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, **सारडी शिवार** येथे काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता आरोपी क. **१) विनायक पुंडलिक झाडे, वय ४२ वर्षे, रा. वार्ड क्र २ नरखेड, २) देविदास दीलीप उईके, वय ३० वर्षे , रा. वार्ड क्र ०३ नरखेड, ३) दुर्गादास प्यारेलाल उईके, वय ४५ वर्षे, रा. रा. वार्ड क्र ०३ नरखेड, ४) अजय राधेश्याम तिवारी, वय ५२ वर्षे, रा. वार्ड क्र १३ नरखेड हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ ताशपत्ते किंमती ५० /—रूपये, रोख रक्कम १५,०००/—रूपय आणि एक मोटर सायकल एम.एच ४० , सि.पी ९६८८ किंमती ६०,०००/— रुपये असा एकुण किंमती ७५,०५०/—रूपयांचा मुद्देमाल माल जप्त करण्यात आला आहे.** नमुद आरोपीतांविरूध्द १२(अ) म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

